**वि.दि.दा.क्र.५/२०१६**
**विठ्ठल वि. नारायण**
**नि.क्र.७८**

**मी सत्य प्रतिज्ञेवर शपथपूर्वक निवेदन करतो की,**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी</u>**

माझे संपूर्ण नाव – व्यंकट विश्वंबर जगताप,

वय– ६१ वर्षे, व्यवसाय– टंकलेखक व शेती,

राहणार– आनंदवाडी शिवणी, ता.निलंगा, जि. लातूर

**<u>वादीकरीता सरतपास विधीज्ञ श्री. एच. व्ही. गायकवाड यांच्या तर्फे सुरू</u>**

१. मी सन १९८८ पासून टंकलेखनाचे काम करतो. मी न्यायालय परिसरात ऑगस्ट २००० ते ऑगस्ट २०१५ या कालावधीत टायप मशीनवरती टंकलेखनाचे काम करत होतो. मी वकील दावे, शपथपत्र, कबूलीयतनामा व विधीज्ञांनी सुचवलेली इतर कामे करत होतो. ठरावपत्राचे टंकलेखनाचे काम झाल्यानंतर त्यावर मी माझी सही करत होतो. माझी सही करण्यापुर्वी मी दस्तावर दस्त करुन देणार व घेणार यांच्या सह्या घेत होतो. मी टंकलेखन केलेला व त्यावर माझी स्वाक्षरी असलेला दस्त मला दाखविला तर तो मी ओळखू शकतो. दिनांक २३.०५.२००७ रोजीचे ठरावपत्र मला आता दाखविले, ते मीच टंकलिखीत केले आहे, त्यावर माझी टंकलेखक म्हणून सही आहे, तो दस्त ज्ञानोबा जाधव यांनी विठ्ठल दुधभाते यांच्या हक्कात करुन दिलेला आहे. मौजे दादगी ता. निलंगा येथील भूमापन क्र. ७/१ मधील ८३ आर क्षेत्राबाबतचा दस्त आहे. त्या दस्तात नमूद मिळकतीची एकूण किंमत रक्कम रुपये ५,००,०७५/–. ठरावाच्यावेळी माझ्या समक्ष ज्ञानोबा यांना विठ्ठल यांनी रक्कम रुपये ५,०००/– इसारत म्हणून दिले. त्यांच्यामध्ये शासकीय परवानगी प्राप्त झाल्यानंतर खरेदीखत करण्याचे ठरविले होते. तशा ठरावपत्राचे टंकलेखन झाल्यानंतर मी ते ठरावपत्र ज्ञानोबा व विठ्ठल यांना वाचून दाखविले, त्यानंतर त्यांच्या व साक्षीदारांच्या सह्या घेतल्या व शेवटी त्यावर मी माझी

सही केली. दिनांक २३.०५.२००७ रोजीच्या ठरावपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. ते ठरावपत्र पुर्वीच्याच **(नि.क्र.७५)** वर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**मध्यान्हामुळे उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.11.07 17:06:30 +0530

(रवि वि.पांडे)

दिनांक ०७/११/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर.

**<u>मध्यान्हानंतर नविन शपथेवर प्रतिवादी क्र.१ करिता उलट तपास विधीज्ञ श्री. एस. ए. सबनीस यांच्या वतीने सुरू.</u>**

२. ठरावपत्र **(नि.क्र.७५)** दुययम निबंधका कार्यालयातून नोंदणीकृत नाही हे म्हणणे खरे आहे. ठरावपत्र **(नि.क्र.७५)** यास पुरेसा मुद्रांक जोडलेला नाही हे म्हणणे खरे आहे. दस्त होत असताना तो कायदेशीररित्या वैध ठरतो किंवा नाही हे मी पाहत नाही. ठरावपत्र **(नि.क्र.७५)** करावयाचे मला कोणत्या विधीज्ञांनी सुचविले होते ते मी सांगू शकत नाही. ठरावपत्र **(नि.क्र.७५)** वरील लिहून घेणार ज्ञानोबा शिवाय मी इतर कोणीही माझ्या ओळखीचे नव्हते. मी जे दस्त टंकलिखीत करतो किंवा ज्या दस्तावर मी टंकलिखीत करणार म्हणून सही करतो त्यास दस्तासोबत मी दस्ताशी संबंधीत लोकांचे कसलेच ओळखपत्र ठेवत नाही. मी जे दस्त टंकलिखीत करतो किंवा ज्या दस्तावर मी टंकलिखीत करणार म्हणून सही करतो त्या दस्ताचे कच्चे टिपण किंवा नोंद मी ठेवत नाही. ज्ञानोबा हेच ठरावपत्र **(नि.क्र.७५)** हे लिहून घेणार आहेत अशा ओळखीचा पुरावा मी ज्ञानोबा यांच्याकडून घेतलेला नाही.

ठरावपत्र **(नि.क्र.७५)** संबंधीत कोणत्याच व्यक्तीचे मी ओळखपत्र घेतलेले नाही. ठरावपत्र **(नि.क्र.७५)** मधील नमूद व्यवहार, माझ्या समक्ष झालेला नाही हे म्हणणे खरे आहे. ठरावपत्र **(नि.क्र.७५)** मधील नमूद रक्कमा केव्हा देण्या–घेण्याचे ठरले होते हे मला आठवत नाही. ठरावपत्र **(नि.क्र.७५)** मधील नमूद रक्कमा माझ्यासमोर दिल्या घेतल्या किंवा नाही हे मला आठवत नाही. मी सरतपास खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही. ज्ञानोबा माझ्या ओळखीचे असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.11.07 17:06:34 +0530

(रवि वि.पांडे)

दिनांक ०७/११/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर.